क्रमांक १५७४० /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक :- १३ ऑक्टोबर, २०२१

**संदर्भ :-** या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १५३२०/क-१, दिनांक ६ ऑक्टोबर, २०२१

**:: कार्यालयीन आदेश ::**

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२१ चे आगामी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजीपासून सुरु होणार आहे. या अधिवेशनाच्या अनुषंगाने या सचिवालयाचे कामकाज विधान भवन, नागपूर येथे गुरुवार, दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ रोजीपासून सुरु होईल. विधानमंडळाच्या नागपूर येथील अधिवेशनाच्या अनुषंगाने विधान भवन, नागपूर येथील कार्यालयात मा.पीठासीन अधिकारी, मा.उप पीठासीन अधिकारी, दोन्ही सदनांचे मा.विरोधी पक्षनेता यांच्या दालनांची व कार्यालयीन कक्षांची व्यवस्था, या सचिवालयातील अधिकाऱ्यांची निवास व वाहन व्यवस्था तसेच या सचिवालयातील कर्मचाऱ्यांची निवास व्यवस्था संबंधीत मान्यवर तसेच अधिकारी / कर्मचारी विधान भवन, नागपूर येथे पोहोचण्यापूर्वी होणे आवश्यक आहे.

सदरहू व्यवस्था करण्याची जबाबदारी विधान भवन, नागपूर येथील कार्यालयात कार्यरत असलेले श्री.कै.**श.** पाझारे, कक्ष अधिकारी यांच्यावर सोपविण्यात येत आहे. श्री.पाझारे, कक्ष अधिकारी यांनी श्री.र.ग. जगदाळे, अवर सचिव यांचे मार्गदर्शन घेऊन त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी पूर्ण करावी. या व्यवस्थे संदर्भातील कामकाजाचा अहवाल श्री.पाझारे, कक्ष अधिकारी यांनी प्रत्येक आठवड्याच्या सोमवारी मा.प्रधान सचिव यांना ई-मेल द्वारे सादर करावा.

आदेशानुसार,

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

श्री.कै.**श.** पाझारे, कक्ष अधिकारी, विधान भवन, नागपूर.

**प्रतिलिपी :-**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
२) श्री.अ.शं. महाजन, विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
३) श्री.रा.म. तारवी, उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
४) श्री.र.ग. जगदाळे, अवर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
५) कक्ष अधिकारी, ग-१ कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
६) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.